# बृहन्मुंबई महानगरपालिका

लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय मुंबई - 22

क्रमांक - लोटिरु/ 376/विप्र

दिनांक – 19.04.2023

## <u>सूचना पत्रक</u>

लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय यांच्या आस्थापनेवरील ‘ कनिष्ठ ग्रंथपाल ’ संवर्गातील 02 रिक्तपदे, सरळसेवेने पदे भरण्याची कार्यवाही पूर्ण होईपर्यंत कंत्राटी पध्दतीने (प्रत्येक 29 दिवसांच्या कालावधीनंतर 1 दिवसाचा सेवाखंड देवून) भरण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहे. विहित नमुन्यातील अर्ज www.portal.mcgm.govया संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सदर पदासाठी खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनी रु. 291/- + 18% जीएसटी = एकूण रु.345 /- इतके शुल्क लो.टि.म.स. रुग्णालयाच्या रोखपाल विभागात दि. 28.04.2023 पर्यंत कार्यालयीन वेळेत (शनिवार तसेच रविवार व सार्वजनिक सुट्टी वगळून) सकाळी 11 ते दुपारी 3 वाजेपर्यंत भरुन, त्याची पावती अर्जासोबत जोडून अर्ज लो.टि.म.स. रुग्णालयाच्या आवक/जावक विभागात सादर करावा.

**पदाचे नाव -** कनिष्ठ ग्रंथपाल

**<u>शैक्षणिक अर्हता:-</u>**

उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाचा पदवीधारक (बी. ए. / बी. कॉम. / बी. एस. सी.) व ग्रंथालय विषयातील पदवीधारक (बी. एल. आय. एस. सी. किंवा एम. एल. आय. एस. सी.) असणे आवश्यक आहे.

| अनु क्र . | पदवी | आवश्यक गुण | प्राधान्य देण्यात येणा या-विद्यापीठाचे अनुक्रमे नाव |
|---|---|---|---|
| १. | बी. ए. / बी. कॉम / बी. एस. सी. | किमान 55% | १) मुंबई विद्यापीठ<br>२) एस .एन. डि.टि.<br>३) ईंदिरा गांधी नॅशनल ओपन विद्यापीठ |
| २. | बी. एल. आय .एस. सी. | किमान 55% | १) मुंबई विद्यापीठ<br>२) एस .एन. डि.टि.<br>३) ईंदिरा गांधी नॅशनल ओपन विद्यापीठ<br>४) यशवंतराव चव्हाण विद्यापीठ<br>५) शिवाजी विद्यापीठ |
| ३. | एम .एल.आय.एस.सी. | उत्तीर्ण असल्यास प्राधान्य | १) मुंबई विद्यापीठ<br>२) एस. एन. डि.टि.<br>३) ईंदिरा गांधी नॅशनल ओपन विद्यापीठ<br>४) यशवंतराव चव्हाण विद्यापीठ<br>५) शिवाजी विद्यापीठ |

सर्व आवश्यक प्रमाणपत्रांच्या जसे की, शैक्षणिक (गुणपत्रिका व प्रमाणपत्रे),

i) एम. एस. सी. आय. टी. उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र,

ii) ईंग्रजी टायपींग ३०wpm परीक्षा उत्तीर्ण

iii) मराठी टायपींग ३०wpm परीक्षा उत्तीर्ण, इत्यादीच्या प्रमाणित प्रतीलिपी अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

iv) मान्यताप्राप्त वैद्यकीय महाविद्यालयातील कनिष्ठ ग्रंथपाल पदाचा **अनुभव असल्यास प्राधान्य** देण्यात यईल.

सदर नियुक्ती कंत्राटी तत्त्वावर एका वेळी एक महिन्यापेक्षा जास्त नाही, इतक्या कालावधीकरीता, प्रत्येक २९ दिवसाच्या कालावधी नंतर एक दिवस सेवा खंड देऊन पुनर्नेमणूक अथवा सरळसेवेद्वारे अर्हताधारक उमेदवार उपलब्ध होईपर्यंत यापैकी जे अगोदर होईल अशा स्वरुपात करण्यांत येईल.

**वयाची अटः-** वय १८ वर्षांपेक्षा कमी व ३८ वर्षांपेक्षा अधिक नसावे आणि मागासवर्गीयांकरीता 43 वर्षांपेक्षा अधिक नसावे.

**सर्वसाधारण अटी -**

1. उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतम परिक्षेत 100 गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय (उच्च स्तर किंवा निम्न स्तर ) घेऊन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

2. उमेदवाराने संगणकाचे ज्ञान किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे MSCIT OR GECT चे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे.

3. उमेदवारांनी विवाहनोंदणी प्रमाणपत्र, नावात बदल झाल्याचे राजपत्र सादर करावे. तसेच ते नसल्यास विवाहित महिला उमेदवार विवाहापूर्वीच्या नावाने अर्ज करु शकतात. उमेदवाराने अर्जावर पासपोर्ट आकाराचा फोटो लावावा व त्यावर त्याने उपलब्ध जागेत स्वाक्षरी करावी.

4. उमेदवाराने पदविका /पदवी परीक्षा एकापेक्षा जास्त प्रयत्नांत उत्तीर्ण केली असल्यास ती परीक्षा किती प्रयत्नात उत्तीर्ण केली याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

5. उमेदवाराला कोणत्याही न्यायालयात नैतिक अधःपतन किंवा फौजदारी स्वरुपाच्या खटल्यात शिक्षा दिली असल्यास, तसेच उमेदवाराविरुध्द पोलिस चौकशी / न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असल्यास / शिक्षा झालेली असल्यास उमेदवाराने त्याबाबत माहिती देणे आवश्यक आहे.

6. निवडप्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती / प्रमाणपत्रे / कागदपत्रे सादर केल्यास किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल. तसेच नियुक्ती झालेली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

7. उमेदवार नोकरी करीत असल्यास पूर्वीच्या नियुक्तीचे ना हरकत प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे.

8. प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव निवड प्रक्रिया कोणत्याही वेळेस कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार महानगरपालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना आहेत.

9. उमेदवारांना मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

10. निवड झालेल्या उमेदवारांस रुपये 500/- च्या बंधपत्रावर विहित नमुन्यातील कंत्राट करार करणे आवश्यक असून सदरहू खर्च संबंधित उमेदवारास करावा लागेल.

11. निवड झालेल्या उमेदवाराविरुध्द कोणताही गुन्हा नोंदविला नाही अथवा सिध्द झालेला नाही असे चारित्र्य प्रमाणपत्र संबंधित पोलीस स्टेशनकडून नेमणुकीनंतर एक महिन्याच्या आत सादर करणे आवश्यक राहील.

12. सदर कंत्राटी तत्वावरील पदधारकांची नियुक्ती कोणत्याही वेळी पूर्वसूचना न देता रद्द करण्याचे अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांना आहेत.

13. सदर कंत्राटी तत्वावरील पदधारकाच्या नियुक्ती कालावधीमध्ये उमेदवाराने शिस्तभंग केल्याचे निदर्शनास आल्यास त्यांची नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल.

14. कुठल्याही कारणास्तव निवड झालेल्या उमेदवारास पदाचा राजीनामा द्यावयाचा असल्यास त्याने 30 दिवसांची पूर्वसूचना देणे बंधनकारक आहे.

15. कंत्राटी कनिष्ठ ग्रंथपाल याला दरमहा एकूण रु. 25,000/- एवढे निश्चित वेतन मिळेल. या वेतना व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचा महागाई भत्ता, घरभाडे भत्ता इत्यादी अनुज्ञेय असणार नाही. सदर वेतनातून व्यवसाय कर वजावट करण्यात येईल.

16. उपरोक्त पदाची कंत्राट तत्वावर नियुक्ती 29 दिवसांपेक्षा जास्त नाही, अशा प्रकारे करण्यात येईल. सदर कालावधीत नियमित तत्वावर कनिष्ठ ग्रंथपाल संवर्गातील रिक्त पदे सरळसेवेने भरण्यात आल्यास, सदर कंत्राटी कर्मचा-याची नेमणूक / सेवा समाप्त करण्यात येईल.

17. सदर उमेदवाराला ग्रंथालयाच्या वेळेच्या अनुषंगाने काम करावे लागेल. सदर उमेदवाराची कामाची वेळ 2 पाळयांमध्ये म्हणजेच सकाळी 8.30 ते दुपारी 3.30 किवा दुपारी 1.00 ते रात्री 8.00 पर्यंत असेल.

18. उमेदवारास नियुक्त केलेल्या विभागातील सत्रांनुसार साप्ताहिक रजा अनुज्ञेय असेल, त्या व्यतिरिक्त कंत्राटी कर्मचा-यांना लागू असणा-या प्रचलित नियमानुसार नैमितिक रजा अनुज्ञेय असतील.

19. त्यांची नेमणूक करार पध्दतीची असल्यामुळे त्यांना कोणत्याही न्यायालयात जाता येणार नाही.

20. बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा नियमावलीनुसार ही नेमणूक झाली नसल्यामुळे त्या अनुषंगाने मिळणारे निंवृत्ती वेतन, भविष्य निर्वाह निधी अथवा तत्सम कोणत्याही प्रकारचे लाभ मिळण्यास ते पात्र राहणार नाहीत.

21. ते दररोज नियमाने हजेरी पटावर त्यांच्या कर्तव्याच्या वेळेनुसार स्वाक्षरी करतील अन्यथा त्यांना गैरहजर धरण्यात येईल. त्यांची विना परवानगी गैरहजेरी विना वेतनी गैरहजेरी करण्यात येईल.

<u>विशेष सूचना –</u>

अ) यापूर्वी संबंधित कार्यालयात व अन्य ठिकाणी सादर केलेले / प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुस-या संस्थेला अर्ज विकणे, स्विकारणे इत्यादींचा अधिकार दिलेला नाही याची कृपया नोंद घ्यावी.

ब) सविस्तर सूचना, याबाबतच्या अटी व शर्ती, मनपाच्या संकेतस्थळावर प्रसारित करण्यात आल्या आहेत. उमेदवारांनी त्याचे बारकाईने अवलोकन करुन संकेतस्थळावर प्रसारीत केलेल्या अर्जाच्या तसेच वैयक्तीक माहितीपत्राच्या नमुन्यामध्ये अर्ज करावा. अर्जाचे विहित शुल्क भरुन त्याची पावती जोडल्याशिवाय अर्ज ग्राह्य धरण्यात येणार नाही.

क) टपालाने आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

प्रशासकीय अधिकारी
लो.टि.वै.महाविद्यालय व रुग्णालय

डॉ. मोहन जोशी
अधिष्ठाता
लो.टि.वै.महाविद्यालय व रुग्णालय

# बृहन्मुंबई महानगरपालिका

लो.टी.म. वैद्यकीय महाविद्यालय व सर्वसाधारण रूग्णालय, शीव, मुंबई 400022

दूरध्वनी क्रं. - 02224066381-89/ दूरध्वनी क्रं. – 022 28541017-18.

## <u>अर्जाचा नमुना</u>

पदाचे नाव :

प्रति,<br>
अधिष्ठाता,<br>
लो.टी.म.वैद्यकीय महाविद्यालय व<br>
सर्वसाधारण रूग्णालय, शीव,<br>
मुंबई - 400022.

बृहन्मुंबई महानगरपालिकेत लो.टी.म.वैद्यकीय महाविद्यालय व सर्वसाधारण रूग्णालय, शीव, मुंबई 400022 मध्ये कनिष्ठ ग्रंथपाल पदाकरिता दिनांक _______________ च्या जाहिरातीनुसार मी खाली सही करणार विनंती अर्ज करत आहे. माझी सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे :

1) (अ) संपूर्ण नाव (आडनाव प्रथम) :

_______________________________________________

2) पत्ता (कायमचा) :

दूरध्वनी / भ्रमणध्वनी क्र -<br>
ई – मेल आयडी -

_______________________________________________

_______________________________________________

3) पत्ता (पत्रव्यवहाराचा) :

_______________________________________________

_______________________________________________

4) जन्म दिनांक: ______________________________

5) वजन: _________________ किलोउंची: ____________________ सें.मी.

6) वय:

7) शैक्षणिक अर्हता: ______________________________________________

मी यान्वये प्रतिज्ञापूर्वक असे जाहीर करतो / करते की, वरील माहिती जाणीवपूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून, ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांवर व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे. त्यापैकी कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी उमेदवारी रद्द केल्यास माझी काहीही तक्रार राहणार नाही.

सोबत : प्रमाणपत्रांच्या प्रमाणित प्रति

आपला / आपली विश्वासू,<br>
अर्जदाराची सही<br>
(अर्जदाराचे नाव)

दिनांक :

# बृहन्मुंबई महानगरपालिका

लो.टी.म. वैद्यकीय महाविद्यालय व सर्वसाधारण रूग्णालय, शीव, मुंबई 400022

दूरध्वनी क्रं. - 0224063081-89

## <u>वैयक्तिक माहितीपत्र (BIO-DATA)</u>

1) संपूर्ण नाव (आडनांव प्रथम) मराठीत: ______________________________________

2) वडिलांचे संपूर्ण नाव: __________________________________________________

3) विवाहापूर्वीचे संपूर्ण नाव (महिलांकरिता): ____________________________________

4) पत्ता ___________________________________________________________

____________________________________________________________

5) दूरध्वनी क्रमांक:______________________________________________________________

6) ई – मेल आयडी________________________________________________________________

7) लिंग– पुरुष ______________स्त्री _________________

8) जन्मदिनांक: दिनांक________ महिना________ वर्ष _________

दिनांक ________________ रोजी असलेले वय ________ महिने _______ दिवस____

9) शैक्षणिक अर्हता:

| शैक्षणिक अर्हता | शालांत परीक्षा मंडळ/विद्यापीठाचे नाव | गुणांचा तपशील | | | दहावी / बरावी परीक्षेतील गुण | | | | उमेदवार किती प्रयत्नात परीक्षा उत्तीर्ण झाला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्राप्त गुण | पैकी | टक्केवारी | मराठी | | इंग्रजी | | |
| | | | | | गुण | पैकी | गुण | पैकी | |
| दहावी | | | | | | | | | |
| बारावी | | | | | | | | | |
| पदवी<br>B.A.,B.Com,<br>B.Sc., B.L.I.Sc. | | | | | | | | | |
| पदव्युत्तर<br>M.L.I.Sc. | | | | | | | | | |
| इतर | | | | | | | | | |
| MSCIT/ GECT | | | | | | | | | |
| टंकलेखन<br>इंग्रजी<br>मराठी | | | | | | | | | |

10) कामाचा अनुभव: ____________________________________________

11) स्थानिक पोलीस ठाण्याचा पूर्ण पत्ता:

_____________________________________________________

_____________________________________________________________________

12) उंची: ____ फूट __ इंच, वजन: ______ कि.ग्रा., शरीराची ठेवण: किरकोळ / मध्यम / सुदृढ

वर्ण: _________ नेत्र वर्ण: _________ वैयक्तिक खून:_____________________

13) संगणक विषयक ज्ञान: MS-CIT किंवा शासनाने विहित

केलेल्या संगणक विषयक अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र: आहे / नाही

14) उमेदवार सध्या नोकरी करीत आहे किंवा नाही ? होय / नाही

असल्यास त्याबाबतचा तपशील:

______________________________________________

_____________________________________________________________________

15) उमेदवाराविरुद्ध पोलीस चौकशी / न्यायालयिन प्रकरण प्रलंबित / प्रस्तावित आहे का ? असल्यास त्याबाबतचा तपशील द्यावा. होय / नाही.

16) उमेदवारास पूर्वी शिक्षा झाली होती का ? शिक्षा झाली असल्यास, शिक्षेचा तपशील नमूद करण्यात यावा व न्यायालयीन निर्णयाची प्रमाणित प्रत अर्जासोबत जोडण्यात यावी. होय / नाही

आपला / आपली विश्वासू,

अर्जदाराची सही
(अर्जदाराचे नाव)

दिनांक: